## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

## व

## महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाबाबतची संक्षिप्त माहिती

शासनाच्या विविध विभाग व प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या सेवा काही वेळा सामान्य नागरिकांपर्यंत पोहचत नाहीत किंवा त्या सेवा प्राप्त करण्यासाठी नागरिकांना अनेकवेळा प्रयत्न करावे लागतात. या परिस्थितीमध्ये आमूलाग्र बदल करण्यासाठी राज्याने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा क्रांतिकारी कायदा केला आहे. नागरिकांना शासनाच्या अधिसूचित सेवा प्राप्त करुन घेण्याचा अधिकार देणारा व प्रशासनाला जबाबदार व उत्तरदायी बनविणारा हा कायदा आहे. या कायद्यामुळे नागरिकांना तत्परतेने, विहित कालावधीत सहज व सुलभपणे सेवा मिळणे शक्य होत आहे.

आतापर्यंत शासनाच्या विविध विभागांच्या पाचशेहून अधिक सेवा या कायद्यांतर्गत अधिसूचित करण्यात आल्या असून यापैकी सुमारे चारशे सेवा या "आपले सरकार पोर्टल" तसेच "आर.टी.एस. महाराष्ट्र" या मोबाईल ॲपवर ऑनलाइन उपलब्ध आहेत. घरी बसून नागरिक त्या सेवा प्राप्त करु शकतात. तसेच आपल्या गावातील "आपले सरकार सेवा केंद्रावर" जाऊन देखील या सेवांचा लाभ मिळू शकतो. या अधिसूचित सेवांची यादी प्रत्येक कार्यालयात दर्शनीभागी व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे निर्देश आहेत. वरील प्रमाणे अधिसूचित सेवा दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व यासंदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्याखाली "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग" गठीत करण्यात आला असून "आपली सेवा आमचे कर्तव्य" असे आयोगाचे ब्रीद वाक्य आहे. आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत. पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास त्या विरुध्द वरिष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते. तेथेही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास रु. ५,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

याबाबतची अधिकची माहिती https://aaplesarkar.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.